शनिवार दि.२२ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## आधार कार्ड नोंदणी करणाऱ्या सेंटरसाठी एक लाखांचे बक्षीस !

# ० ते ५ वयोगटातील नोंदणीसाठी बक्षीस-माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांची घोषणा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात १२.८ कोटी नागरिकांची आधार नोंदणी झाली असून, ५ ते १८ वयोगटातील शंभर टक्के नोंदणी झाली आहे. तसेच ० ते ५ वयोगटातील नोंदणी ३९ टक्के आहे. त्यामुळे या वयोगटात एका महिन्यात सर्वात जास्त नोंदणी करणाऱ्या सेंटरला १ लाखांचे बक्षीस देण्यात येईल, अशी घोषणा माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांनी आज केली.राज्यातील आधार कार्ड नोंदणी करणाऱ्या सेंटरना माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे नवीन संचाचे वाटप करण्यात येणार असून आज सह्याद्री अतिथीगृहावर या योजनेचा शुभारंभ मंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नौनोटीया आणि संचालक अनिल भंडारी, उपनगर जिल्हाधिकारी राजेद्र शिक्षरसागर आदी उपस्थित होते.

आज शुभारंभ करताना प्रातिनिधिक स्वरूपात मुंबई, शहर, उपनगर, ठाणे, पालघर विभागातील आधार कार्ड सेंटर चालकांना या संचाचे वाटप करण्यात आले. यावेळी पराग जैन यांनी सांगितले की, नवीन आधार कार्ड तयार करताना विशेषतः १८ वर्षावरील वयोगटातील नागरिकांमध्ये बांग्लादेशी घुसखोरी करु नये याची काळजी घ्या, अशा सूचना यावेळी त्यांनी केल्या. यावेळी मंत्री ड. आशिष शेलार यांनी सांगितले की, आधार नोंदणी केंद्र ही सेवा केंद्र असून मंदिराचे पावित्र त्यांनी जपावे. अनावधानाने ही कुठली चूक झाली तर देशासाठी ही बाब घातक ठरेल. आता देशातील मतदार आणि आधार लिंक करण्याबाबत देश पातळीवर चर्चा जेव्हा सुरु झाली आहे तेव्हा महाराष्ट्र हे राज्य असे आहे जे ही यंत्रणा सक्षम व अद्ययावत करण्यात पुढाकार घेत आहे. राज्यातील आधार संचामध्ये वाढ करण्याबाबत आपण विचार करीत आहोत. तसेच येणाऱ्या काळात अधिक संच उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असून केंद्र चालवणाऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात वाढ करता येईल का? याबाबत देखील सरकार सकारात्मक विचार करीत आहे असेही त्यांनी सांगितले. डिजिटल सुविधा हा नागरिकांचा अधिकार झाला असून ही सेवा देणारे आपण सेवक आहोत आपण जबाबदारीने काम केले पाहिजे असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.



## डॉ.श्रीहरी बुडगेमवार यांनी श्री.संत मन्नथ स्वामी विद्यालयास क्रीडा साहित्य भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

येथिल आध्या डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक तथा वैद्यकिय संस्थेचे सचिव डॉ. श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांनी श्री संत मन्मथ स्वामी माध्यमिक विद्यालयास क्रिडा साहित्य भेट दिल्याने विद्यार्थ्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यार्थी मोबाईल व टीव्ही पहाण्यात अडकला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मैदानी व सांघिक खेळाची गोडी लागावी. त्याचे मनोबल वाढावे, नेतृत्व गुणाला वाव मिळावी म्हणून एक सामाजिक उपक्रम राबवत डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी तालुक्यातील सांगवी बे. सारख्या ग्रामीण भागात असलेल्या श्री संत मन्मथ स्वामी माध्यमिक विद्यालयाच्या टिमने पावसाळी क्रिडा स्पर्धेत व्हॉलिबॉल खेळात विभाग पातळी पर्यंत मजल मारली या मुळे डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी शाळेस व्हॉलिबॉल, नेट भेट देऊन सर्व खेळाडु विद्यार्थांचा गौरव केला. यावेळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद आडकिने, डॉ. श्रीहरी बुडगेमवार, संचालक शंकरराव होनशेट्टे, बालाजी होणशेट्टे, मनोज कांबळे, मिलिंद जोंधळे, विजयकुमार मस्कले, मुख्याध्यापक एम. आर. मोमिण आदी उपस्थित होते.




## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश संघटक सचिवपदी डॉ.सोनकांबळे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

त्यांना निवडीचे पत्र आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस शिवाजी गर्जे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश कार्यालय मुंबई येथे देण्यात आले.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य अजितदादा पवार साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खासदार सुनीलजी तटकरे,संजयजी बनसोडे साहेब (मा. क्रीडा,युवक कल्याण व बंदरे मंत्री महाराष्ट्र राज्य) आमचे सर्वांचे लाडके नेते, कार्यसम्राट आमदार श्री. प्रतापरावजी पाटील चिखलीकर साहेब (कंधार –लोहा ) विधानसभा मतदारसंघ) आमदार शिवाजी गर्जे साहेब (सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश) श्री. दिलीपरावजी धर्माधिकारी (ग्रामीण जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड) आपण सर्वांनी माझ्यावरती जो विश्वास दाखवला त्याला कधीही तडा जाऊ देणार नाही. आपण माझ्यावर जी जबाबदारी टाकली ती पूर्ण करणार.शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा,अजितदादा पवार साहेबांचे राजकीय सामाजिक ध्येय धोरण महाराष्ट्रात तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी व पक्ष वाढवण्यासाठी मी कटिबध्द आहे.असे यावेळी डॉ.उत्तम सोनकांबळे यांनी उद्गार काढले. त्यांच्या निवडीचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात आले. त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.





कवळे गुरुजी यांची नांदेड येथे ठाकूर परिवारास सांत्वन पर भेट.धर्मभूषण दिलीप सिंह ठाकुर यांचे वडील कै.गोपाल सिंह ठाकुर यांचे निधन झाल्याची बातमी कळताच नांदेड जिल्ह्याचे लोकनेते श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी ठाकूर परिवाराच्या दुःखात सहभागी होत नांदेड निवासस्थानी सांत्वन पर भेट दिली.( छाया – बाजीराव पाटील)

## अवकाळी पावसामुळे रब्बीचे पीक भोईसपाट


# शेतकऱ्यांचा वाली कोण शासन पंचनामा कधी करणार?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पा.जाधव**

दि.२० मार्च २०२५ गुरूवार रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बीचे पीके भोईसपाट झाले असून शेतकरी हावालदिल झाला आहे.शासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे.पावसाच्या अगोदर डोलणारे ज्वारीचे पिक भोईसपाट झाले आहे.आंबा, लिंबू, संत्रा, मौसंबी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे गळून पडले आहेत त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे तसेच भाजीपाला पिके, जनावरांचा चारा ,काढून ठेवलेली हळद ,काढायला आलेली हळद ,केळी ऊस आडवा पडून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे यांचे शासनाने पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यातून होत असून शासन कधी पंचनामे करणार असे शेकडो शेतकरी म्हणून दाखवत आहेत.शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.





## राष्ट्रीय आविष्कार उपक्रमातंर्गत विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

# समग्र शिक्षा अभियान:दगडवाडी शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद जालना अंतर्गत राष्ट्रीय आविष्कार उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दगडवाडी जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचा राज्याबाहेरील पाच दिवसीय अभ्यास दौरा नुकताच संपन्न झाला. या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी कर्नाटक राज्यातील म्हैसूर, बंगळूरू येथील विविध ठिकाणांना भेटी देऊन तेथील माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांचे अनुभव विश्व संपन्न व्हावे, त्यांना परराज्याची माहिती मिळावी, निरीक्षण क्षमता विकसित व्हावी, सांस्कृतिक ओळख व्हावी यासाठी जालना जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख सर, समग्र शिक्षा अभियान सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुनील मावकर यांच्या मार्गदर्शनानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थी व शिक्षक यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग नोंदविला. या अभ्यास दौऱ्यात कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथील प्रसिद्ध ऐतिहासिक पॅलेस, वृंदावन गार्डन, प्रसिद्ध चर्च, चांमुडा हिल्स, प्राणी संग्रहालय येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर कर्नाटक राज्याची राजधानी बंगळूरु येथील लालबाग, विश्वेश्वरय्या औद्योगिक व प्रौद्योगिक संग्रहालय, हिंदुस्थान एरोबिक्स लिमीटेड हेरीटेज सेंटर व एरोस्पेस म्युझियम, इस्कॉन टेम्पल अशा विविध वैज्ञानिक, भौगोलिक, ऐतिहासिक, स्थळांना भेट देऊन संकल्पना समजावून घेतल्या. या अभ्यासदौऱ्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दगडवाडी केंद्र दानापुर येथील इयत्ता आठवीचा शुभम गणेश कोलते इयत्ता सातवीची साक्षी राजु वाघ व इयत्ता सहावी चार ओम मधुकर पांडे सहभागी झाले होते. सर्वांचे आशा मुकेश पांडे भोकरदनचे गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर, शिक्षणविस्तार बी एल बडगे, गट समन्वयक शेनफड नेव्हार, केंद्रप्रमुख गणेश सोळुंके, मुख्याध्यापक पुंडलिक सोनुने, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी पाटील पांडे ,शिक्षक जिजा वाघ, संदीप वायाळ, गजेंद्र येवले,ममता पांडे,मनिषा अंभोरे,शेख सर यांनी अभिनंदन केले. हा अभ्यासदौरा यशस्वी करण्यासाठी समग्र शिक्षा जिल्हा परिषद जालनाचे सहाय्यक लेखाधिकारी बी. ए. मिसाळ, प्रशांत सोरटी, राजेश ठाकूर, शिक्षिका नंदा वलकुट्टी, अर्चना गुंगे, अर्चना कंदारे शिक्षक श्रीधर कुलकर्णी, जगदिश डोंबे, अनंता जाधव यांनी परीश्रम घेतले.



## जागतिक वन दिनानिमित्त सुगाव येथे प्रगती माध्यमिक विद्यालयात कार्यक्रम




लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील केरुर बिट अंतर्गत २१ मार्च रोजी जागतिक वन दिनानिमित्त देगलूर ता. मौ. सुगाव येथील प्रगती माध्यमिक विद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण आणि वनसंवर्धनाचा संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबवले. कार्यक्रमाची सुरुवात शालेय प्रांगणात वृक्षारोपणाने झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. उपवनसंरक्षक नांदेड श्री.केशव वाबळे याची प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वनीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले आणि प्रत्येकाने किमान एक झाड लावण्याचा संकल्प केला पाहिजे, असे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन, आणि पथनाट्य सादर करून वनीकरण व पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती केली. या वेळी शिक्षक आणि पालकवर्गानेही सक्रिय सहभाग घेतले आहे यावेळी मा.उपवनसंरक्षक नांदेड.श्री केशवजी वाबळे, सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा) नांदेड.श्री भिमसिंग ठाकुर ,वनपरिक्षेत्र (प्रा) देगलुर श्री.निखिल हिवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल देगलुर श्री शंकर गेडाम , सहदेव दोसलवार वनरक्षक केरूर,कैलाश व्होनशेट्टे वनरक्षक मरखेल, केशव कदम वनरक्षक मानुर, सुभाष नाईक वनमजुर , प्रगती माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक,शिक्षक.. विद्यार्थीसह जागतिक वन दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला विद्यार्थींचा सहभाग पाहायला मिळाला.

# देगलूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागांच्या अधिकारी गंदीगुडे व लिपिक शेख यांच्या अनागोंदी कारभारामुळे–नागरिक त्रस्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागांच्या अनागोंदी व भोंगळ कारभारामुळे तालुक्यातील विधवा महिलां, दिव्यांग आदी नागरीकांचे रेशनकार्ड अंत्योदय, प्राधान्य विविध योजनेतून मिळणारे धान्य सुचना न देता जवळपास सहा महिण्या पासून अचानकपणे धान्य बंद केल्यामुळे त्या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार गंदीगुडे वैशाली (मॅडम) यांच्या उद्धट पणामुळे नागरीक त्रस्त झाले आहेत.

या कार्यालयात खाजगी एजंटाचा सुळसुळाट झाला आहे. जास्तीचे आर्थिक मलिदा लाटण्यासाठी नवीन शिधापत्रिका काढणे, विभक्त करणे, नावाची दुरुस्ती करणे, रेशनकार्डात विवाहित महिलांची व लहान मुलांची नावे समाविष्ट करणे, लग्न झालेल्या मुलींची नावे कमी करणे,पत्ता बदलणे आदी स्वरूपाची कामे तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात केली जातात परंतु या रेशनकार्डसाठी कार्ड धारकांकडून हजारो रुपयांची लूट केली जात आहे. ज्या लोकांकडून चार आकड्यांच्या रक्कमा घेऊन त्यांना तात्काळ रेशनकार्डसह विविध योजनेत समाविष्ट करून कार्ड दिल्या जात असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे.

या पुरवठा विभागाच्या काही मोजक्या अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने चक्क बाहेरच्या खाजगी एजंट व्यक्तीची एन आय सी द्वारे ऑनलाईन कॉम्प्युटरवर चे कामे करण्यासाठी खाजगी ऑपरेटर व एजंटच पूर्ण टेबल सांभाळत आहेत तात्काळ मेवा द्या अन् सेवा घ्या अशी परिस्थिती स्पष्ट दिसून येते तर सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांना रेशन कार्डसाठी वारंवार इतर काम धंदे सोडून कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असून नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.



तहसील कार्यालया अंतर्गत असलेला पुरवठा विभाग हा अन्नदाता विभाग म्हणून समजला जातो पण हे अन्नदाता विभाग नसून गिन्नदाता विभाग बनला आहे. या पुरवठा विभागात मनमानी कारभार सुरू आहे कर्मचारी गोरगरीब जनतेचे वेळेवर काम करत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे शिधापत्रिका व इतर कामासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात ये – जा करावी लागत आहे. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे.पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांकडून नागरिकांच्या समस्या कडे दुर्लक्षता दर्शविली जात आहे.ज्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी नोंदविल्यास अधिकाऱ्यांनी त्या तक्रारीकडे दुर्लक्ष व केराची टोपली दाखवली जात असल्याने पुरवठा विभागाच्या अधिकारी गंदीगुडे वैशाली मॅडम चे मनमानी कारभार सुरूच असून मनोधैर्य वाढलेले दिसून येत आहे. सर्व सामान्य व सामाजिक कार्यकर्ते रेशनकार्ड, विविध योजनेची माहिती बाबत विचार पुस करण्यासाठी गेलेल्या कार्यकर्त्यांना तुमचं काम आहे का, ते मला माहित नाही अशा उडवा उडवीच्या उत्तरे देऊन तुम्हाला कोठे जायचे असेल तेथे जा खालून ते वर पर्यंत अधिकारी व पदाधिकारी आमचेच आहेत अशा दादागिरी व उद्धटपणाची भाषा वापरून एकतर्फी मनमानी अनागोंदी व भोंगळ कारभार चालवून शिधापत्रिका वेळेवर दिला जात नाही मुदतीमध्ये काम होत नसल्याने काम चुकार व दुर्लक्ष करत असलेल्या पुरवठा विभागांच्या नायब तहसीलदार गंदीगुडे वैशाली मॅडम व लिपिक कलीम शेख यांच्या मनमानी कारभाराची तात्काळ चौकशी करून बाहेरच्या जाफर पटेल खाजगी एजंट ऑपरेटरची हकालपट्टी करण्यात यावे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रस्त सहन करावा लागत आहे. अन्यथा लोकांमध्ये रोष निर्माण होऊन आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे नागरीकांतून उलट सुलट चर्चा चालू आहे.

# मनसे व म्हाळसा यांच्या डान्स स्पर्धेला अभूतपूर्व प्रतिसाद

## महिला मुलींनी नोंदवला अभूतपूर्व सहभाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे संकल्पनेतून व म्हाळसा प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित डान्स स्पर्धा २०२५ ला मोठा प्रतिसाद मिळाला. स्पर्धेची सुरुवात छ.शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रा. दुष्यंता रामटेके, बीड प्रसारचे संपादक समीर काझी, दैनिक पार्श्वभूमीचे आनंद वीर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे, म्हाळसा प्रतिष्ठानच्या सचिव मयुरीताई बाबर यांचे समवेत दुसरे मान्यवर करीत आले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव काशीद यांनी केले. डान्स स्पर्धेत महिलांच्या व मुलींच्या सहभागाची नोंद घेण्यात आली, ज्यामुळे या कार्यक्रमाला विशेष रंगत आली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात जागतिक महिला दिन निमित्ताने साजरा करण्यात आला. यावेळी, डान्स स्पर्धेत सहभागी महिला व मुलींनी आयोजक वर्षाताई जगदाळे यांचे आभार मानून महिलांना एक स्वतंत्र व्यासपीठ दिल्याबद्दल प्रशंसा केली. या पहिल्याच डान्स स्पर्धेने एकत्रित प्रतिभा आणि सामर्थ्य व्यक्त करण्यासाठी एक चांगला मंच प्रदान केला आहे, ज्यामुळे महिला सशक्तीकरणाच्या पथावर एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. या विशेष कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या सर्वांसाठी एक अद्भुत अनुभव ठरला, आणि भविष्यातील स्पर्धांसाठी एक सकारात्मक संदेश गेला.

# विकास बनसोडे यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या–शैलेंद्र पोटभरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यात प्रेमसंबंधाच्या संशयावरून विकास बनसोडे या तरुणाला पत्र्याच्या शेडमध्ये डांबून बेदम मारहाण करत हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. शनिवारी रात्री ही घटना घडली असून, या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात दहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मृत तरुणाचे नाव विकास अण्णा बनसोडे (वय २३) असून, तो जालना जिल्ह्यातील बोरगाव येथील रहिवासी होता. आष्टी तालुक्यातील पिंपरी (घुमरी) येथील भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर तो तीन वर्षांपासून चालक होता. काही महिन्यांपूर्वी त्याला कामावरून काढण्यात आले होते. मात्र, तो दोन दिवसांपूर्वी पिंपरी येथे मित्रासह आला होता. याचदरम्यान भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या मुलीशी विकासचे प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपींना आला.या कारणावरून आरोपींनी संगनमत करून विकासला दोरी आणि वायरच्या सहाय्याने अमानुष मारहाण केली.मारहाणीत गंभीर जखमी झाल्याने शनिवारी रात्री त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपींनी मृतदेह चारचाकी वाहनात टाकून कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणला आणि पसार झाले. या हत्येपूर्वी दोन दिवस बेदम मारहाण करतानाच विकासच्या फोनवरून त्याच्या आई–वडिलांना बोलावण्यात आले होते. लवकर या, आल्यावर सांगतो काय झाले, असे सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.याप्रकरणी मृत युवकाच्या फिर्यादीवरून भाऊसाहेब भानुदास क्षीरसागर, बाबासाहेब भानुदास क्षीरसागर, स्वाती भानुदास क्षीरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर, संकेत भाऊसाहेब क्षीरसागर, संभाजी झांबरे, सचिन भवर, भाऊसाहेब क्षीरसागर, सुशांत शिंदे आणि बापूराव शिंदे या दहा जणांवर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी भाऊसाहेब भानुदास क्षीरसागर, स्वाती भाऊसाहेब क्षीरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर यांना अटक केली आहे. सहा आरोपी अटक केली आहे त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचे मराठवाडा अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी केली आहे.

# बिलोली पोलिस ठाणे महिला दक्षता समितीच्या अध्यक्षपदी सौ.सविता कांबळे यांची निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली पोलिस ठाणे अंतर्गत कार्यरत असलेल्या महिला दक्षता समितीच्या अध्यक्षपदी सौ. सविता राजेंद्र कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. महिला सुरक्षेसाठी तसेच त्यांच्या न्याय हक्कांसाठी कार्य करणाऱ्या या समितीला सक्षम नेतृत्व मिळाले आहे. सौ. सविता कांबळे या सामाजिक कार्यात सक्रिय असून, महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे.या निवडीमुळे महिलांच्या सुरक्षेसाठी व कल्याणासाठी अधिक प्रभावी पद्धतीने काम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. बिलोली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मा. अतुल भोसले यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# २३ मार्चला लसाकमची बैठक

लोकनेता न्यूज नेटवर्क । **नांदेड । गौतम बनसोडे**

कर्मचाऱ्यांच्या विविध विषयावर व सामाजिक प्रश्नांसाठी लसाकम नांदेड जिल्हा शाखेच्या वतीने दिनांक २३ मार्च रविवारला नांदेड जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर बैठक लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांचे अध्यक्षतेखाली होणार असून या बैठकीत लसाकमचे मार्गदर्शक शिवा कांबळे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक, लसाकमचे महासचिव गुणवंत काळे , लसाकम कोषाध्यक्ष डि .एम .तपासकर , चंद्रकांत मेकाले राज्य प्रवक्ता, मराठवाडा अध्यक्ष अण्णासाहेब तोडे , मराठवाडा उपाध्यक्ष शिवाजीराव टोम्पे मल्हारराव तोटरे मराठवाडा उपाध्यक्ष, शिवाजीराव कासारकर, सुग्रीव अंधारे, प्रकाश ईश्वरे, नारायणराव पोतरे,ल.मा.शेवाळकर, नागोराव भांडवले,एस.जी.भोसले, यांच्या प्रमुख उपस्थितीत

दिनांक:– २३ रोजी ११:३० वाजता स्थळ:– कॉम्रेड दत्ताजी देशमुख सभागृह वर्कर्स फेडरेशन कार्यालय नवा मोंढा नांदेड. डॉ.अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ ,होटल सैलानीचे बाजूला आढावा बैठक संपन्न होणार आहे. आहे .या बैठकीस सर्व सभासद व पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब, जिल्हा सचिव पि.एम.सुर्यवंशी, चंद्रकांत भांडवले, मारोती घोडजकर यांनी केले आहे.

# वरुड (चक्रपान)येथे आयुष्यमान भारत अग्रोस्टिक यांचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील वरुड चक्रपान येथे दिनांक २१ मार्च रोजी ग्री स्टिक व आयुष्यमान भारत कॅम्पचे आयोजन वरुड चक्रपान ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला गावातील नागरिकांनी ग्री स्टिक व आयुष्यमान भारत कार्ड काढले असून या कार्यक्रमाला उपस्थित वरुड चक्रपान मंडळ अधिकारी, तलाठी मॅडम पोधाडे ग्रामपंचायतचे ग्राम अधिकारी अरुण वाबळे व, गावातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते यावेळी शेतकऱ्यांना तलाठी मॅडम पोधाडे यांनी योग्य मार्गदर्शन केले ,ग्रीस्टीक व आयुष्यमान कार्ड वाटण्यात आले, उपस्थित गावातील मंडळी कांतराव कोटकर काशीरामजी कोटकर किसन घोडेकर पमु घोडेकर व अधिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी खा.खतगावकरांचा २३ मार्च रोजी नरसीत असंख्य समर्थकांसह राष्ट्रवादी पक्षात जाहीर प्रवेश

## ना.अजितदादा यांचा राष्ट्रवादी नांदेड जिल्ह्यात नंबर वन वर असेल–आ.प्रताप पाटील चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

नांदेड जिल्ह्याचे अनेक विकास कामे मार्गी लावण्याच्या हेतूने माजी मंत्री माजी खासदार तथा काँग्रेस पक्षांचे ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर उद्या २३मार्च रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा गट या मध्ये प्रवेश करीत असून माझ्या सोबत माजी आ.पोकर्णा, डॉ. मीनल खतगावकर, यांच्या सह अंदाजे तीनशे सरपंच, आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य,चेअरमन, उपसरपंच, व्हॉईस चेअरमन, व काँग्रेस कार्यकर्ते प्रवेश करणार आहेत. जवळ पास विस हजार जनसमुदाय या पक्ष प्रवेश सोहळ्यास येणार या साठी भास्कर पाटील भिलवंडे यांच्या नरसी येथील शेतात भव्य सभा मंडप उभारणी होत आहे त्याचे भूमी पूजन करण्यात आले अशी माहिती अठरा मार्च रोजी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी दिली. ते पुढे म्हणाले माझ्या पक्ष प्रवेशावर टीका टिपणी करणाऱ्यांनी अगोदर आपण पक्ष बदलला का नाही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील, माधवराव किन्हाळकर, बळवंतराव चव्हाण, वसंतराव चव्हाण, गोरठेकर, कुंटुरकर, या सह अनेकांनी राजकीय परिस्थितीत पक्ष बदलला, त्या मुळे पक्ष बदलावर न जाता ती व्यक्ती जनतेच्या विकासा करिता किती कामाची आहे याचे निरीक्षण करावे असे त्यांनी टीकाकारांना उत्तर दिले.



मी राष्ट्रवादी पक्ष का निवडला तर त्याचे कारण म्हणजे राष्ट्रवादी पक्ष हा सर्व समाज घटकाना घेऊन चालणारा व अजित दादा च्या नेतृत्वात विकासाची कामे धडाडीने करणारा पक्ष आहे म्हणून इतर पक्षाची ऑफर धुडकावून या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असे त्यांनी सांगितले.दि. २३ मार्च रोजी नरसी ता. नायगाव येथे राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शनासह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये स्नुषा डॉ. मीनल खतगावकर आणि माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा व ३०० सरपंच व आपल्या असंख्य समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे असे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार पक्ष गटाचे भास्कर पाटील भिलवंडे यांच्या शेतात नियोजित सभास्थळी झालेल्या पत्रकार परिषदेत खतगावकर दादा यांनी स्पष्ट सांगितले.राष्ट्रवादीचे प्रमुख अजित दादाचा पक्ष जिल्ह्यात एक नंबरचा राहील, आमदार प्रताप पा चिखलीकर.येत्या २३तारखेला ठरलेला ज्येष्ठ नेते माजी खा. खतगावकर दादा व त्यांच्या समर्थकांच्या प्रवेशा नंतर त्यांच्या साथीने व मार्गदर्शनाने नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी अजित दादा पक्ष नंबर वन करण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे असे आमदार चिखलीकर यांनी पत्रकार परिषदेत दिले. आम्ही एकोप्याने पक्ष वाढविण्यासाठी निष्ठेने काम करू, अशी भावना व्यक्त करत महायुतीच्या बाबद बोलताना कोणाला युती तोडून निवडणूक लढवायची खुमखुमी असेल तर आमची पण तयारी आहे असे म्हणत येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या तयारीचे संकेत त्यांनी या वेळी दिले. राज्यातील महायुती बाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील. आम्ही मैत्री धर्म जपणारे आहोत. त्यामुळेच मित्र पक्षातील कोणालाही आजपर्यंत आम्ही आमच्या पक्षात आम्ही प्रवेश दिला नाही. भाजपाने निलंबित केलेल्यांना मात्र आम्ही स्वीकारले असे स्पष्ट केले

शरद पवार गटाचे भास्कर पाटील भिलवंडे यांचा पक्ष प्रवेश निश्चित दर दरम्यान पत्रकार परिषदेच्या वेळी, शरद चंद्र पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर पाटील भीलवंडे,भाजपचे जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे,श्रावण पाटील समर्थक धनराज शिरोळे यांचीही उपस्थिती दिसली. याबाबत दादा व चिखलीकरांना छेडले असता, भास्कर पाटलाचा प्रवेश २३ तारखेला होणारच आहे,असे स्पष्ट संकेत देत भास्करराव पाटील खतगावकर यांनी ३०० च्या वर सरपंच व अनेकांच्या पक्ष प्रवेशाचे संकेत दिले. या विषयी भास्कर भिलवंडे यांना विचारले असता त्यांनीही संमती दर्शवली.

# माझी वसुंधरा अभियानात माहूरला दुसऱ्या क्रमांकाचे विजेते पद; माहूर नगरपंचायतला पन्नास लाख रुपयाचे बक्षीस

## शासनाच्या वेबसाईटवर शासनाकडून डॉ राजकुमार राठोड यांचे फोटो टाकून अभिनंदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

माहूर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार म्हणून कामगिरी बजावत असलेले नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे कडे तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी काही काळापुरता मुख्याधिकारी म्हणून पदभार सोपविला होता या काळात त्यांनी शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सर्वच बाबतीत उत्कृष्ट कार्य केल्याने शासनाकडून छत्रपती संभाजी नगर विभागीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे विजेते पद व ५० लक्ष रुपयांचे बक्षीस जाहीर करून डॉ राजकुमार राठोड यांचे फोटो शासकीय वेबसाईटवर टाकून त्याचे अभिनंदन केल्याने माहूर शहरवासी यातून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत स्पर्धा ठेवण्यात आली होती, या स्पर्धेत प्रत्येक नगरपंचायतने सहभाग घेतला होता. माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड सह सर्व नगरसेवक, नगरसेविका कडून अभियानात नायब तहसीलदार तथा तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. राजकुमार राठोड यांनी शासकीय निकषाप्रमाणे प्रत्येक काम लोकसहभागातून तसेच कर्मचाऱ्याकडून उत्कृष्टरित्या करून घेतल्याने माहूर शहरात माझी वसुंधरा अभियान सक्सेसफुल ठरले होते याची दखल शासनाने घेऊन शासकीय निकषाप्रमाणे १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपंचायत साठी ही स्पर्धा होती यामध्ये माहूर नगरपंचायत मुख्याधिकारी डॉ. राजकुमार




गोविंदराव राठोड यांनीअभियान कालावधीत ०१ हजार पेक्षा अधिक देशी वृक्षांची लागवड करण्यात आली असून, त्यांचे व यापूर्वी लागवड केलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यात आले आहे.वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी ०३ हजार पेक्षा अधिक देशी वृक्ष असलेली रोपवाटिका तयार करण्यात आली आहे.सणासुदीच्या वेळेस होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी गावात कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्यात आले असून निर्माण होणाऱ्या निर्माल्य पासून उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत बनविले जात आहे. त्यामुळे नगरपंचायतीस स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत ओ डी एफ ++ मानांकन प्राप्त झाले आहे असे शासकीय वेबसाईटवर जाहीर करण्यात आले आहे.सोबतच अभियानाच्या जन जागृतीसाठी शहरात आय लव यू हे चकाकणारे सेल्फी पॉईंट बसविण्यात आले होते .काही कारणास्तव ते काढावे लागले ती बाब वेगळी.शहरात ठीक ठिकाणी माझी वसुंधरा तत्वे दर्शवणाऱ्या बाबींच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिध्दी करण्यात आली आहे. तसेच सर्व पथदिव्याच्या खांबावर तिरंगा दर्शविणारे लाइट्स बसविण्यात आले आहेत माहूर नगरपंचायतीने माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत शासनाच्या निकषाप्रमाणे माहूर नगरपंचायतने तंतोतंत कामगिरी बजावल्याने शासनाचा वेबसाईटवर वरील प्रकारे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे फोटो टाकून अभिनंदन करण्यात आले आहे.या अभियानात नगराध्यक्ष फिरोज दोसानी ,उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड ,कार्यालय अधीक्षक वैजनाथ स्वामी यांचे सर्व अधिकारी कर्मचारी व तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतल्याने नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांनी महाराष्ट्र शासनासह सर्व पदाधिकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# महसूल विभागाचा मोठा निर्णय; ‘जिवंत सातबारा मोहीमे’द्वारे नेमका काय होणार बदल?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

राज्यातील सातबाऱ्यांसंदर्भात राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यभरात ‘जिवंत सातबारा मोहीम’ सुरू करण्याबाबत सांगितले आहे. ज्याद्वारे आता सातबाऱ्यावरील सर्व मृत खातेदारांऐवजी वारसांची नावे नोंदवली जाणार आहेत. मृत व्यक्तींच्या नोंदी शेतजमिनीच्या खरेदी-विक्री आणि कर्ज प्रक्रियांमध्ये अडचणी निर्माण करतात. त्यामुळे या उपक्रमामुळे कायदेशीर अडचणी कमी होऊन प्रक्रिया सुलभ होईल.

ही मोहीम राबवण्यासाठी तहसीलदारांची समन्वय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या या मोहिमेअंतर्गत १० मे पर्यंत राज्यातील सर्व सातबारा अद्यायावत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या फक्त बुलढाण्यात सुरू असलेली जिवंत सातबारा मोहीम आता १ एप्रिल पासून राज्यभरात राबवली जाणार आहे.

या मोहिमेअंतर्गत सातबारा उताऱ्यावर असणाऱ्या गावातील सर्व मृत खातेदारांची नावे कमी होणार असून त्याऐवजी आता वारसांची नावे लागणार असल्याचं स्पष्ट करण्यात आले. आवश्यक कागदपत्रांमध्ये वर्षांची नोंद नसल्यामुळे बऱ्याचदा जमीन व्यवहारांमध्ये अनेकांना अडचणी येतात. त्यामुळे राज्य सरकारने जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

### काय होणार फायदा ?

* या मोहिमेमुळे सातबाऱ्यावरील माहिती अद्ययावत राहील.
* वारसांना कायदेशीर अडचणींवर नियंत्रण मिळवता येईल.
* जमिनीच्या हस्तांतरणातील विलंब कमी होईल.
* शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ जलद मिळेल.
* पारदर्शकता वाढेल आणि प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होईल.

### कशी असणार ‘जिवंत सातबारा मोहीम’ ?

* जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात १ ते ५ एप्रिल दरम्यान तलाठी गावात चावडी वाचन करतील.
* या वाचनादरम्यान न्यायप्रविष्ट प्रकरणे सोडून गावनिहाय मृत खातेदारांची यादी तयार करण्यात येणार आहे.
* ६ ते २० एप्रिल दरम्यान वारसा संबंधित कागदपत्रे तलाठ्यांकडे सादर करता येतील.
* स्थानिक चौकशी करून मंडळ अधिकारी हे वारस ठराव ई फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करतील.
* २१ एप्रिल ते १० मे या कालावधीत तलाठी यांनी ई फेरफार प्रणालीमध्ये मृत खातेदारांऐवजी वारसाचे नाव नोंदवण्यात येईल.
* त्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी वारस फेरफारवर निर्णय घेऊन सातबारा दुरुस्त करावा.
* ज्यानंतर मृत व्यक्तीच्या ऐवजी वारसा व्यक्तीचे नाव सातबारावर येईल.
* महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार मंडळाधिकारी सुधारित सातबारा तयार करतील.

ही प्रक्रिया विनाशुल्क असेल.

# शेतकऱ्यांनी तात्काळ ग्रिस्टॅक प्रकल्पा अंतर्गत नाव नोंदणी करून घ्यावी-तहसीलदार विनोद गुंडमवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

संपूर्ण महाराष्ट्र राज्याने भारत सरकारची ग्रिस्टॅक संकल्पना राज्यात राबविण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे. सदर संकल्पनेनुसार शेतकऱ्यांसाठीचे तीन पायाभूत माहिती संच तयार करावयाचे काम चालू आहे.अद्याप बऱ्याच शेतकऱ्यांनी आपल्या नावाची नोंदणी करून घेतली नाही तरी सर्व शेतकऱ्यांनी त्वरित नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन एका परिपत्रकाद्वारे भोकरचे तहसीलदार मा.विनोद गुंडमवार यांनी केले आहे.



भोकर तालुक्यातील सीएससी केंद्राच्या माध्यमातून शेतकरी माहिती संच नोंदणी सुरू आहे.अनेक योजनेचा लाभ शेतकरी माहिती संच प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे.उदा.पीक कर्ज,पी एम किसान योजनेचा लाभ,पिक विमा,हमीभाव खरेदी इत्यादी करिता तहसील कार्यालयात देखील शेतकरी माहिती संच निर्मिती कक्ष स्थापन करण्यात आला आहे. दिनांक २१ मार्च २०२५ पर्यंत तालुक्यातील केवळ १६ हजार ८६६ शेतकऱ्यांनीच नोंदणी केली असून अजून अंदाजे २० ते २२ हजार शेतकऱ्यांची नोंदणी अद्यापही शिल्लक राहिलेली आहे.तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी गावातील नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध करीत असून अशा नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ जवळील सीएससी केंद्रास भेट देऊन नोंदणी करून घ्यावी आणि सरकारी योजनेच्या लाभापासून शेतकरी माहिती संच नसल्यामुळे आपण वंचित राहणार नाही याची पुर्णपणे खात्री करून घ्यावी अशी विनंती त्यांनी सर्व शेतकरी बांधवांना केली आहे.

# अशी माणसे पाठीशी असताना कोणती गोष्ट कमी पडेल!



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

जनतेच्या निखळ प्रेमाची अशी काही उदाहरणे समोर येता की अशावेळी स्वतःला भाग्यवान समजण्यापलीकडे आपल्याला काहीच करता येत नाही.


माझ्या मतदारसंघातील अंबुलगा बु. येथील श्री. बिभीषणजी बिरादार यांनी मी चौथ्यांदा विधानसभेवर निवडून जात नाही, तोपर्यंत चप्पल न घालण्याचा निर्धार केला होता. आई जगदंबेचची कृपा आणि यांच्या सारख्या सामान्य जनतेच्या प्रेमामुळे चौथ्यांदा व सलग तिसऱ्यांदा विधानसभेवर निवडून जाण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे आज त्यांनी माझ्यासाठी घेतलेल्या कष्टातून थोडे फार उतराई होण्याचा प्रयत्न केला. बिभीषणजी यांचा निलंगा येथील निवासस्थानी सत्कार करून त्यांना वस्त्र व पादत्राणे भेट म्हणून दिली. माझ्यावरील विश्वास आणि प्रेमासाठी त्यांचे आभार देखील मानले.

# आळंदीचे मुख्याधिकारी श्री.कैलास केंद्रे यांची लातुर महानगरपालिकेच्या उपायुक्त पदी नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. कैलास केंद्रे यांची लातुर महानगरपालिकेच्या उपायुक्तपदी पदोन्नती झाली असून नातेपुते नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री माधव खांडेकर हे आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.मागील दोन वर्ष मुख्याधिकारी श्री.कैलास केंद्रे यांनी माऊलींच्या संजीवन समाधीस्थळाने पवित्र असणाऱ्या अलंकापुरी नगरीमध्ये विकासात्मक दृष्टीकोन ठेवून अनेक विकास कामे केली आहेत.सिद्धबेट परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जैविक खताचा वापर, पाण्याची सोय, स्वच्छता व सुरक्षा यासाठी विशेष व्यवस्था व करण्यात आली.आळंदी शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने शिवस्मारक परिसरातील अतिक्रमण हटवून शिवसृष्टी तयार करण्यात आली. चाकण चौकात कचऱ्याचे साम्राज्य हटवून तुळशी वृंदावन निर्मिती केल्याने श्रीक्षेत्र आळंदीच्या वैभवात खऱ्या अर्थाने वाढ झाली आहे.चाकणवरून आळंदी शहरात प्रवेश करतांना वारकरी, भाविक यांचे मन प्रसन्न होते.श्री.भैरवनाथ चौकात ज्ञानियांचा राजा श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व चांगदेव भेट भव्य शिल्प उभारले आहे.तसेच चार नंबर शाळेसमोर हरिपाठ बाल उद्यान उभारण्यात आल्याने आळंदी शहर व परिसरातील बालचमूंची खेळण्याची व्यवस्था झाली आहे.आळंदी नगर परिषदेचे शासकीय ठेकेदार श्री.शकूर मुसा भाई हकीम यांनी हरिपाठ बाल उद्यानाचे उत्कृष्ट पारदर्शक काम केल्याने नुकताच आळंदी नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री कैलास केंद्रे व आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बी. एस. नरके यांच्या हस्ते श्री शकूर हकीम व मूर्तीकार अक्षय भोसले यांचा सत्कार करण्यात आला होता.नगरपरिषद चौकात आकर्षक स्वागतकमान, टाऊन हॉलचे नूतनीकरण व नगरपरिषद शाळेच्या इमारतीमध्ये अंतर्गत विकासकामे करण्यात आली.विद्यार्थ्यांसाठी चित्रभिंती आणि विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.नगरपरिषद उत्पन्न वाढीसाठी शॉपिंग सेंटर बांधकाम सुरू आहे.आळंदी नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष , अभ्यासु, धार्मीक कामाची आवड असणारे मुख्याधिकारी श्री.कैलास केंद्रे यांच्या कार्यकाळात इंद्रायणी नदी प्रदूषण रोखण्यासाठी महत्वाचा ठरणारा व अनेक वर्ष रखडलेला एस.टी.पी.प्रकल्प प्रगतीपथावर आला आहे.तसेच नगरपरिषद शाळा क्रमांक ४ ची शालेय इमारत बांधण्याचे काम सुरू आहे.या सर्व विकासकामांमुळे मुख्याधिकारी श्री.कैलास केंद्रे साहेब आळंदीकर नागरीकांच्या, नगरपरिषदेतील अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार,युवक महिला, वारकरी, भाविक, ज्येष्ठ नागरीक, विविध क्षेत्रातील पदाधिकारी,कार्यकर्ते यांच्या आठवणीत राहतील.



## परळी बस स्थानकात पाच नवीन लालपरीचे आगमन पण

# ओठाला पाणी पुसले पण घष्यात कोरड तशीच परळीतील बस स्थानकातील बसची अवस्था!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

राज्य परिवहन महामंडळाच्या परळी आगार हे प्रभू वैध्यनाथ जोतिर्लिंग चे शक्तिपीठ आहे, येथे राज्यातून परराज्यातून अनेक प्रवासी परळी येथे वैधनाथ नगरीत दर्शनासाठी येत असतात, या आगारातील अनेक बसेसची दयनीय अवस्था पहावयास मिळत आहे, परळी आगारास दहा ते पंधरा बसेस ची आवश्यकता असून फक्त पाच बसेस देऊन ओठाची कोरड पुसल्या सारखे समजावे लागेल, नवीन



पाच गाड्या लांबपल्यासाठी पाठवल्या जातील पण परळी तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रवाशी शेतकऱ्याचे शाळकरी विध्यार्थी यांचे अदळाआपटीने कंबरडे मोडत आहे, काही बसेस ला काचाच नाहीत तर काहींचे वरचे छप्पर हालत असलेले पहावयास मिळत आहे, यात प्रवाश्याला तसेच शाळकरी मुले मुली यांना उन्हाळ्यात उन्हाची झळ, पावसाळ्यात पाण्याचा वसारा, हिवाळ्यात गारवा सहन करावा लागत आहे, यात आणखी दहा नवीन बस उपलब्ध असत्यातर तर परळी ग्रामीण भागातील शाळकरी विध्यार्थी व शेतकरी प्रवाश्याचा प्रवास सुखकर होईल व झाला असता, तरी यात नवीन पाच गाड्याची भर असल्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशी वाहतुकीसाठी फायदेशीर ठरेल असा आशावाद व्यक्त होत आहे, दिवसेंदिवस वाढणारी प्रवासीसंख्या आणि अपुऱ्या बस संख्येमुळे या नवीन पाच बसेस परळी नगरीत स्वागत म्हणावे लागेल. यावेळी परळी बस आगारात या नवीन बसेस चे उदघाट्न परळी बस स्थानक चे आगार प्रमुख सिद्धार्थ सोनवणे, व टी व्ही नाईन चे प्रतिनिधी संभाजी मुंडे, यांच्या हस्ते श्रीफळ फोडून पूजा करण्यात आली यावेळी आगारातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते,

# बेंबरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यकारिणीची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील बेंबरा येथे भारत रत्न प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त समाजातील बैठक बोलावण्यात आली होती. त्या बैठकीत एकमताने जयंती मंडळाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली ते खालील प्रमाणे आहेत.

अध्यक्ष विशाल खंडू कांबळे, उपाध्यक्ष अभिजित बंडू कांबळे, कोषाध्यक्ष रजनीकांत मारोती कांबळे, सचिव सुशील संजय कांबळे, सहसचिव पवनकुमार यादव कांबळे, सदस्य धोंडीबा कांबळे, शंकर कांबळे, पुंडलिक कांबळे, माधव कांबळे, बाबु कांबळे, संतोष कांबळे, यादव नरसिंग कांबळे व आदी उपस्थित होते.



# जिल्हा परिषदेची अनुकंपा भरती करा अनुकंपा धारकांची नांदेड जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी

## प्राथमिक प्रतीक्षा यादी प्रकाशीत होऊन दिड महिन्यांचा कालावधी उलटला तरी २०२५ वर्षाची अंतीम प्रतीक्षा अद्याप पर्यंत प्रसिद्ध नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | गोविंद पा.मोरे

जिल्हा परिषद अनुकंपा धारकांची अंतीम प्रतीक्षा यादी प्रसारीत करुन २०२५ या वर्षाची अनुकंपा पदभारती करण्यात यावी अशी मागणी प्रतीक्षा यादीतील अनुकंपा धारकांनी अनेक वेळा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या कडे निवेदना द्वारे केली आहे परंतु जिल्हा परिषद प्रशासन अनुकंपा भरती बाबत उदासीन असल्याचे व अनुकंपा धारकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे पहावयास मिळत आहे.घरातील कमावता व्यक्ती गमावल्या नंतर कुटुंबाला उदरनिर्वाहा साठी आधार म्हणुन एका व्यक्तीला अनुकंपा तत्वावर शासकीय नोकरी देण्यात येते,काही उमेदवारांचे वय हे बाद होऊन ते प्रतीक्षा यादीतून बाहेर पडण्याची भीती निर्माण झाली आहे,व तसेच काही उमेदवारांचे आई – वडील दोन्हीही हयात नसल्याने ते अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत,




दरवर्षी अनुकंपा नियमानुसार जानेवारी महिन्यात अनुकंपा धारकांची प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करुन भरती करण्यात यावी असा नियम आहे परंतु यावर्षी मार्च महिना उलटला तरी भरती तर दुरच आणखी अनुकंपा धारकांची अंतीम प्रतीक्षा यादी सुद्धा प्रसिद्ध करण्यात आलेली नाही तर भरती केंव्हा करण्यात येईल ? हा प्रश्न अधांतरीतच आहे.गतवर्षी अनुकंपा धारक उपोषणास बसल्या नंतर फेब्रुवारी महिन्यात प्राथमिक प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली होती व लोकसभा निवडणुक आचार संहितेचे कारण देत अंतीम प्रतीक्षा यादी जून महिन्यामध्ये प्रकाशित करण्यात आली होती.यावर्षी प्राथमिक प्रतीक्षा यादी दि.०४ फेब्रुवारी रोजी संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे मात्र मार्च महिना माध्यावर आला तरी अंतीम प्रतीक्षा अद्याप प्रकाशित करण्यात आलेली नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमा मध्ये जिल्हा परिषद अनुकंपा नियुक्तीतील पदे प्राधान्याने भरण्यात यावी असे निर्देश राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्रशासनास दिले आहेत परंतु मुख्यमंत्र्याच्या या कृती आराखड्यास कराची टोपली दाखवण्याचे काम जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभाग करत असल्याचे पाहण्यास मिळत आहे.गतवर्षी भरती साठी उशीर झाल्यानंतर काही अनुकंपा धारकांनी खा. अशोक चव्हाण यांच्याकडे त्यांच्या व्यथा मांडल्या नंतर त्यांनी तत्कालीन ग्रामविकास मंत्री व नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन यांच्याशी समन्वय साधत तात्काळ ऑगस्ट महिन्यामध्ये अनुकंपा भरती करण्यासाठी पुढाकार घेतला होता.आपल्या धडाकेबाज निर्णय शैलीने ओळखल्या जानाऱ्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल आणि अनुकंपा भरतीशी संबंधित सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार हे याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर भरती करण्यासाठी काय पावले उचलतील हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# शिधापत्रिकाधारकांनी ई केवायसी न केल्यास धान्य बंद होणार-रामेश्वर गोरे

## दि.३१ मार्च पुर्वी ई केवायसी करून घ्यावी अन्यथा दर महिन्याला मिळणारे धान्य बंद होईल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार | धोंडीबा मुंडे

कंधार शहरातील व तालुक्यांतील अन्न सुरक्षा,अंत्योदय शेतकरी योजने अंतर्गत धान्य घेणाऱ्या सर्व शिधापत्रिकाधारकांनी तत्काळ दि.३१ मार्च पुर्वी ई केवायसी करून घ्यावी अन्यथा त्यांना दर महिन्याला मिळणारे धान्य बंद होईल,अशी माहिती तहसीलदार रामेश्वर गोरे तसेच पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिज यांनी दिली.शासनाने शिधापत्रीकाधारकांना ई केवायसी करणे बंधनकारक केले आहे.केवायसी न केल्यास त्यांना धान्य मिळणार नाही. स्वस्त धान्य दुकानातून ई पॉस मशिनव्दारे मोफत केवायसी केली जात आहे. परंतू लहान मुले आणि वृध्दांच्या बोटांचे ठसे आणि डोळ्यांव्दारे स्कॅन करताना अडचणी येत आहेत,

आतापर्यंत तालुक्यातील हजार १ लाख ३१ हजार ८५५ लाभार्थ्यांनी ई–केवायसी केलेली असून ७० हजार ३८२ लाभार्थ्यांनी अद्याप ई–केवायसी केलेली नाही. तसेच ६५ टक्के लोकांनी ई–केवायसी केली आहे. तर ३५ टक्के लोकांची ई – केवायसी करणे बाकी आहे. त्यामुळे त्यांचा धान्य पुरवठा बंद होवू शकतो. शहरातील व तालुक्यातील शिधापत्रिका धारकांनी तत्काळ ई केवायसी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



लाभार्थ्यांना आता स्वस्त धान्य दुकानात न जाता काही मिनीटात मोबाईलवरुन त्यांच्या कुटूंबाची ई केवायसी पूर्ण करता येणार आहे. यासाठी शासनाने मेरा ई केवायसी हे प उपलब्ध करुन दिलेले आहे. यांचा वापर करण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरुन मेरा ई केवायसी मोबाईल प व आधार फेस आरडी प डाउनलोड करायचे आहे,नंतर आधार क्रमांक टाकल्यानंतर ओटीपी येईल ओटीपी टाकून सबमीट केल्यानंतर ई केवायसी पूर्ण होणार आहे.आतापर्यंत ई केवायसीसाठी रेशनकार्ड वरील प्रत्येक सदस्याला रेशन दुकानात जोडुन ई पॉस मशिनवर अंगठा लावावा लागत होता त्यानंतर ई केवायसी पूर्ण होत होती. मात्र अनेक कार्डधारक नोकरी, व्यवसाय कामकाजाच्या निमित्ताने बाहेरगावी राहत असल्याने त्यांच्या रेशनकार्ड असलेल्या गावांत येता आले नाही. आता मोबाईल पमुळे हे काम सोपे होणार आहे. केवायसी करण्यासाठी दि.३१ मार्चची अंतीम मुदत आहे.तरी या मुदतीत सर्वांनी ई केवायसी करुन घ्यावे, असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे व पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिज यांनी केले आहे,

# यशोगाथा शाहीराची,किमया केंद्रीय मानवा अधिकाराची, दखल शाहीर इश्वर मगर यांची




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हिवरा आश्रम | प्रतिनिधी

नुकतेच अंतर्राष्ट्रीय स्तरावर आपल्या सक्षम कारकिर्दीचा ठसा उमटविणारे केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली चे प्रादेशिक अधिवेशन मौजे गोळेगाव, ता. बोदवड, जि. जळगाव, पू. खा. येथे दि. १५ मार्च, २०२५ रोजी संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले असून त्याच सोहळ्याचे औचित्य साधून संगठनच्या वतीने पुरस्कार वितरण सुध्दा पार पडले. सदर कार्यक्रमात महाराष्ट्रभर ख्याती प्राप्त विवेकानंद आश्रम चे शाहीर इश्वर मगर यांच्या मानवीय शाहीरी प्रबोधनाची दखल घेऊन केंद्रीय मानवाधिकार संगठन च्या तर्फे संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले, राष्ट्रीय संघटन सचिव तथा साहित्यिक सेवाभावी व वैशिष्ट्यपूर्ण कथाकधनासाठी अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. बबनराव महामुने, छत्रपती संभाजीनगर तथा उपाध्यक्ष बशीर शेख, मुंबई या मान्यवरांच्या हस्ते, त्यांना संविधान गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉ. डी. व्ही. खरात सर, महाराष्ट्र राज्य विशेष उपाध्यक्ष मा. रविंद्र काशिनाथ सोनार, गोळेगाव, डॉ. पंकज इंगळे तसेच डॉ. अमरकुमार तायडे इ.ची उपस्थिती होती.

# प्रतीक शिंदे यांना समाज रत्न पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुदखेड | सदानंद शिंदे

कार्यक्रमाचे संयोजक योग व ध्यान प्रशिक्षक भन्ते कश्यप ली यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार मुदखेड तालुक्यातील दरेगाव येथील प्रतीक शिंदे (आझाद समाज पार्टी चे मुदखेड तालुका अध्यक्ष )यांची त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना समाजरत्न पुरस्कारासाठी निवड केलेली आहे.



प्रतीक शिंदे नेहमी समाज उपयोगी कार्यक्रमात नेहमी सहभाग नोंदवत असतात. आझाद समाज पार्टीच्या माध्यमातून अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम, निवेदन देण्याचं काम करीत असतात.भाई चंद्रशेखर आझाद यांच्या मार्गदर्शनाखाली गाव तेथे शाखाच्या माध्यमातून प्रत्येक गावातील युवा भिम आर्मीशी जोडण्याचं काम त्यांनी केल. त्यांच्या समजपयोगी कार्याची दखल घेऊन भिम गर्जना मित्र मंडळ, परेगावच्या वतीने समाजरत्न पुरस्कार जाहीर केला आहे.पुरस्काराचे वितरण ३० मार्च रोजी होणार आहे.प्रतीक शिंदे यांचे अभिनंदन भिम आर्मी शाखा मुदखेड च्या वतीने केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# उमरी मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण रेणुका मेडीकल उमरी यांच्या वतीने साई पालखी यात्रेकरूंना औषधी किटचे वाटप




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरी | महेश पडोळे

संतकवी दासगणू महाराज प्रतिष्ठान गोरठे (उमरी)* च्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा करण्यासाठी उमरी येथून साईभक्त पायी ४७९ कि.मी चा पायी चालत हि पदयात्रा शिर्डी येथे श्रीराम नवमी च्या आदल्या दिवशी पोहचते या पायी यात्रेतील भाविकांसाठी उमरी मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण रेणुका मेडीकल उमरी ,भाजपा नांदेड लोकसभा ग्रामीण तालुका समनव्यक गजानन श्रीरामवार ,मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाणचे राष्ट्रीय अध्यक्ष रूपेशकुमार गजानन श्रीरामवार व संचालक मंडळ यांच्या वतीने साई पालखीचे स्वागत कर यात्रेकरूंना औषधी किटचे वाटप करण्यात आले यावेळी उपस्थित राष्ट्रवादी नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग देशमुख गोरठेकर, सुभाषराव देशमुख गोरठेकर, भाजपा नांदेड लोकसभा ग्रामीण तालुका समनव्यक गजानन श्रीरामवार,गोपाळ राठोड, पोलीस पाटील दत्तात्रय वारेवार,विष्णूसेट अटल, पारस दर्डा,अशोक मामीडवार,पंडीत बेंबरे, लक्ष्मीकांत देशमुख, सुभाष पेरेवार, शिवाजी शिंदे, साईनाथ करपे, लक्ष्मीकांत देशमुख, अनिल नगनुरवार,गणेश पगलवाड, मारोतराव मोरे, अनंत राखे,प्रितीश अग्रवाल, निखिल हमद,संतोष वैद्य व सर्व साई भक्त गांवकरी मंडळी उपस्थित होत.

# जागृती महिला दक्षता समितीच्या अध्यक्षा ॲड.रेखा हणमंते, चिखली यांना केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली चा संविधान गौरव पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

गोळेगाव | प्रतिनिधी



केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली च्या गेल्या दहा वर्षांपासून सक्षम पदाधिकारी म्हणून सातत्याने सामाजिक सेवाभावी कार्यात अग्रेसर असणाऱ्या ड. रेखा हणमंते, चिखली यांना संगठन चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले यांनी संविधान गौरव पुरस्कार २०२५ जाहीर करून त्यांना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र प्रदान करून त्यांना त्यांचे पती तथा सामाजिक व साहित्यिक तथा संवैधानिक सेवेसाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांच्यासह गौरवान्वित करण्यात आले. गेल्या अर्ध्या शतकापेक्षा जास्त सामाजिक क्षेत्रात सेवाभावी कार्यास्तव विविध पुरस्कारांनी त्यांना आजवर सन्मानित करण्यात आले असून हा त्यांचा बहुमान ठरला आहे. सदर पुरस्कार त्यांना संगठन चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले, राष्ट्रीय संगठन सचिव डॉ. बबनराव महामुने, छत्रपती संभाजीनगर, उपाध्यक्ष बशीर शेख, मुंबई, नवनिर्वाचित विशेष उपाध्यक्ष आयु. रविंद्र काशिनाथ सोनार, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला असून सर्व स्तरांमधून त्याचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# लहान शिवारातील रेणुकाबाई सोपान बुक्करे यांच्या गट नंबर ९२ स्वत:च्या शेतातील आखाडा अचानक आग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मालेगाव | संदीप कदम



लागल्याने जळून गेल्या त्यामध्ये शेती साहित्यसह परिवाराचे घरगुती साहित्य घेऊन मोठे नुकसान झाले सदरची घटना दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे दररोज या ठिकाणी जनावरे बांधली जातात पण सुदैवाने जनावर किंवा इतर विविध हानी झाली नाही पण सदरील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी महसूल प्रशासनाचे अधिकारी,कर्मचारी मंडळ अधिकारी,तलाठी यांना या घटनेची माहिती कळवली आहे.तलाठी भास्कर शेळके व इतर सहकारी घटनास्थळाकडे पाहाणीसाठी रवाना झाले आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904